**नियमित दिवाणी दावा क्र.४६९/२०२२**
हरीषकुमार व इतर वि. इंन्डस टॉवर लि. पुणे.

| | |
|---|---|
| MHPA020024742022 | **<u>निशाणी क्र.१ वरील आदेश.</u>** |

वादी क्र.१ व २ व त्यांचे वकील हजर. वादींनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द पुढे चालवायचे नसल्याबाबत पुरसीस (नि.क्र.२३) सादर केली आहे. सदर पुरसीस नुसार वादी व प्रतिवादी यांच्यातील संपुर्ण वाद संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे वादींना प्रकरण पुढे चालवायचे नसुन प्रकरण काढुन घेण्याकरीता परवानगी दयावी म्हणुन विनंती केली. पुरसीस (नि.क्र २३) चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींना प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा चालवायचा नाही. सबब, वादींना दावा परत घेण्याची परवानगी देणे संयुक्तीक दिसून येते. म्हणुन, खालील आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आदेश</u>**

१. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ आदेश २३ नियम १ नुसार वादींना दावा काढून घेण्याची परवानगी देण्यात येते.
२. सदर प्रकरण बंद करण्यात येते.
३. वादींना कोर्ट फी नियमानुसार परत करावी.

स्वाक्षरीत/–
**(एन.एस. खलाटे)**
दिनांक : ११/०८/२०२६.  ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परभणी.